दि. २९/०३/२०२५

## कारागृह शिपाई (पश्चिम विभाग) भरती -२०२२-२०२३.
## लेखी परीक्षेस पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी.

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आस्थापनेवरील पश्चिम विभागाकडील कारागृह शिपाई पदाची भरती प्रक्रियेमधील मैदानी चाचणी दि. २९/०१/२०२५ ते २६/०३/२०२५ या कालावधीत पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे येथे पार पडली आहे. सदर मैदानी चाचणीमध्ये ५० टक्के व ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविलेल्या उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार सामाजिक व समांतर आरक्षणानुसार रिक्त पदांच्या १:१० प्रमाणांत लेखी परीक्षेकरिता पात्र झालेल्या एकूण ७७११ उमेदवारांची गुणवत्ता यादी खालील प्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

गुणवत्ता यादीस अनुसरुन उमेदवारांना काही आक्षेप/हरकती असल्यास त्यांनी त्यांचे आक्षे/हरकती लेखी अर्जाद्वारे चेस्ट क्रमांक, आवेदन अर्ज क्रमांक व संपूर्ण नांव नमूद करुन estt3.pco.pune@nic.in या ई-मेलवर अथवा व्हॉट्सअॅप क्रमांक ८९७५२८३१०० वर दि.३१/०३/२०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत पाठवाव्यात. तद्नंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेप/हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद उमेदवारांनी घ्यावी.

लेखी परीक्षा दि. ०९/०४/२०२५ रोजी पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे येथे होणार असून परीक्षेकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांनी सकाळी ०५.०० वाजता परीक्षा केंद्रावर वेळेत उपस्थित राहावे. विलंबाने येणाऱ्या उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही.

लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमाकांवर महा-आयटीद्वारे प्रवेशपत्र (HALL TICKET) पाठविण्यात येईल. उमेदवारांनी महा-आयटीकडून त्यांच्या भ्रमणध्वनीवर प्राप्त होणाऱ्या लिंकवरुन त्यांचे प्रवेशपत्र प्राप्त करुन घेवून दिलेल्या वेळेत लेखी परीक्षेस उपस्थित राहावे. उमेदवारांनी प्रवेशपत्रावरील सूचनांचे काटेकारपणे पालन करावे. सदर प्रवेश पत्र (HALL TICKET) शिवाय लेखी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही. लेखी परीक्षेच्या अनुषंगाने प्रसिध्द होणाऱ्या सूचनांकरिता उमेदवारांनी पुणे पोलीस आयुक्तालय, महा-आयटीचे संकेतस्थळ, नोंदणीकृत भ्रमणध्वनीवरील संदेश व ई-मेल नियमितपणे तपासावेत.

टिप :- ज्या उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी रिक्त जागा नसतानाही आवेदन अर्ज सादर करुन भरती प्रक्रियेत प्रवेश घेतला आहे, अशा उमेदवारांची गुणवत्तेमुळे खुल्या प्रवर्गातून लेखी परीक्षेसाठी निवड करण्यात आली आहे. तसेच ज्या उमेदवारांनी मुदतबाहय कागदपत्र सादर केली आहेत व नियमांनुसार विहित निकषांची पुर्तता केलेली नाही अशा उमेदवारांना अपात्र करण्यात आले आहे.

२९/३

(डॉ. संदीप भाजीभाकरे)
पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय,
पुणे शहर.

पोलीस आयुक्त
पुणे शहर

E:\Police Bharti all folders\POLICE BHARTI-2023 (IMPLIMETATION-2024)\JAIL PC PB 2024---------\LETTER.docx

Scanned with CamScanner